।।श्री स्वामी समर्थ ।।

# अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर

पी.टी.आर. नं. एफ-७६५५/नाशिक

## • श्री स्वामी समर्थ गुरुपीठ येथे लावण्यात येणाऱ्या लग्नाच्या अटी व नियम •

- प्रत्येकाने स्वामींची सेवा करावी व सेवा मार्गाची माहिती इतर मंडळींना द्यावी.
- उभयता वधू व वर पक्षांनी प्रथम दिंडोरी दरबारातुन विवाह मंडळाची लेखी परवानगी व प. पू. गुरुमाऊलींचा आशिर्वाद घेणे.
- परवानगी नंतर वधू व वर पक्षाकडील सर्व मंडळींना तसेच वऱ्हाडी मंडळींना गुरुपीठाच्या सर्व नियमावलीचे शिस्तबद्धपणे पालन करण्यास सांगणे.
- वधू व वर पक्षाने कमीतकमी संख्येने वऱ्हाडी गुरुपीठात आणणे.
- विवाहासाठी आलेल्या मंडळींनी आपली वाहाने खाली पार्किंगमध्ये व्यवस्थीत पार्क करावी.
- कुणीही मोठ्याने अवाज गोंधळ करु नये. धुम्रपान अथवा अन्य व्यसने करू नये. करताना अढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.
- हिंदू विवाह कायद्यानुसार मुलीचे वय १८ वर्षे पुर्ण असावे व मुलाचे वय २१ वर्षे पुर्ण असावे तसेच विवाहासाठी आई, वडील, पालकांची पूर्ण संमती असावी.
- वधू व वर पक्षाने आपल्या मुद्रण साहित्यातील विवाह संस्कार हा ग्रंथ खरेदी करुन त्याचे वाचन करुन त्यात वर्णन केल्याप्रमाणे विवाह संस्कार सोहळा पार पाडावा.
- गुरुपीठामध्ये वाजंत्री किंवा बॅण्ड वाजवता येणार नाही, फक्त मंगल वाद्य सनई लावण्यास परवानगी आहे. तसेच सनई व माईकचा आवाज ५० डेसिबल पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. फटाके फोडता येणार नाही तसेच वधू वराने विना चप्पल बूट हात पाय धूवूनच दरबारात प्रवेश करावा. लग्न सोहळा कमीत कमी खर्चात व सोप्या पद्धतीने पार पडेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
- विवाहाची घटीका पाळावी
- गुरुपीठाचे पावित्र्य सांभाळावे, गुरुपीठाच्या साधन सामग्रीचे नुकसान करु नये झाल्यास ते वधू व वर पक्षाकडून भरून घेण्यात येईल.
- वधू व वर पक्षाकडील लोकांनी लग्नापूर्वी व लग्नानंतर गुरुपीठाची स्वच्छता ठेवावी (जे लोक तेथे स्वच्छता व श्रमदान स्वइच्छेने करतील त्यांच्या पदरी स्वामींची सेवा करण्याचे पुण्य प्राप्त होईल हे शाश्वत सत्य आहे.)
- विवाहासाठी आलेल्या प्रतिनीधींनी विवाहस्थळावर आपल्या शिस्तीचे पालन करावे. उगाच इकडे तिकडे भटकून सुरक्षा रक्षकास त्रास देवू नये.
- गुरुपीठामध्ये पुनर्विवाह, प्रेम विवाह, आंतरजातीय विवाह लावता येणार नाही, गुरुपीठात फक्त विनाहुंडा, अल्प खर्ची साधे सोपे विवाह लावले जातील.
- अन्य जागी लावलेले विवाह गुरुपीठात नोंदणी केले जाणार नाहीत.
- गुरुपीठामध्ये वेळोवेळी सामुदायिक विवाह लावण्यात येतात.
- गुरुपीठावर विवाह लावण्यासंबधी सर्व अधिकार गुरुपीठ राखुन ठेवत आहे.
- गुरुपीठावर पार पडलेल्या किंवा पार पडणाऱ्या विवाह सोहळ्यातील घडणाऱ्या कुठल्याही अनुचित प्रकारास गुरुपीठ जबाबदार राहणार नाही.

**टीप :-** परवानगी मिळाल्यानंतर यथायोग्य व यथाशक्ती देणगी विवाह सोहळ्याच्या आठ दिवस अगोदर प्रसादालय कार्यासाठी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे मध्यवर्ती कार्यालयात जमा करणे.

वरील सर्व नियम आम्हाला मान्य आहेत. या सोबतचा परिचय अर्ज आम्ही भरुन देत आहोत.

सोबत खालील कागदपत्र जोडावी. सही

१) वधुवराचे परिचयपत्र, रहिवास पुरावा
२) वधुवराचे जन्माचे/शाळा सोडल्याचे दाखले
३) वधुवराचे पासपोर्ट साइज फोटो
४) लग्न पत्रिका छापलेली असल्यास १ प्रत